IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** म्हसवड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0318 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/10/2024 20:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 22/10/2024
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/10/2024
**Time From (वेळेपासून):** 10:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/10/2024 **Time (वेळ):** 20:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 044

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/10/2024 20:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पळशी,माण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उन्मेष रामचंद्र चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पळशी,माण,म्हसवड ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पळशी,माण,म्हसवड ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7620357661

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विशाल लाला जाधव | | | 1. पळशी,माण,म्हसवड ,सातारा, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 22/10/2024

मी उन्मेष रामचंद्र चव्हाण वय 36 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. पळशी ता.माण जि.सातारा मोनं - 7620357661 मी दि.16/10/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथे समक्ष हजर राहुन पोलीस उपअधीक्षक श्री राजेश वाघमारे यांची भेट घेवुन माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत थोडक्यात तक्रार सांगितली व माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती केली तेव्हा त्यांनी पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले हे तुमच्या तक्रारीवर पुढील कारवाई करतील असे सांगीतले.

त्या नियोजनानुसार दि. 17/10/2024 रोजी 11.30 वा.चे सुमारास पिंपरी फाटा ता.माण जि.सातारा येथे मी हजर असताना पोलीस निरीक्षक श्री.भोसले हे दोन शासकीय पंच, सापळा पथक यांचेसह माझ्या जवळ येवुन थांबले. त्यावेळी त्यांनीमाझी ओळख करुन घेऊन दोन पंचाची व सापळा पथकाची आम्हाला एकमेंकाना ओळख करुन दिली. तेव्हा मी माझी तोंडी तक्रार थोडक्यात सांगितली. त्यामध्ये माझ्या आईचे नांवे मौजे पळशी गावात शेती असून ती मी स्वत: करत आहे. त्याशेती करता दोन विहीरीतून पाईप लाईन करून शेतीमध्ये पाणी आणले आहे. सुमारे 15 दिवसापूर्वी डीपी ओव्हरलोड होवून जळला होता त्यामुळे लाईट बंद आहे. शेताला पाणी न मिळल्यामुळे माझी 3 एकर शेतातील मक्का सुकून चालली आहे. म्हणून मी माझा गावचे वायरमन विशाल जाधव याची भेट घेतली तेव्हा त्यांने सांगितले की, डी.पी. लवकर आणता येईल पण डी.पी. आणायला वाहन खर्च दिला तर डी.पी. लवकर मिळेल. त्यानंतर दिनांक 15/10/2024 रोजी मी रामोशी वस्ती येथून घरी जात असताना वायरमन विशाल जाधव हा भेटला व डी.पी. मंजुर झाली असल्याचे सांगितले. डी.पी. आणायला गाडी खर्चासाठी तुमचे दोन विहीरीचे 300/-रूपये प्रमाणे 600/- रूपये द्या असे म्हणाला. तो मागत असलेल्या गाडी खर्चासाठी कोणतेही पैसे लागत नसून त्याचा सर्व खर्च महावितरण कंपनी करत असते हे मला माहिती असल्याने. वायरमन विशाल जाधव हा मागणी करत असलेला गाडी खर्च लाच असल्याची माझी खात्री पटल्याने त्यांच्यावर आपले विभागामार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. वैगेरे मजकूरची दिनांक 16/10/2024 रोजी लाप्रवि, कार्यालय सातारा येथे दिलेली हस्ताक्षरातील लेखी तक्रारी अर्ज हजर केला होता. तो अर्ज आम्हा पंचास दाखवला सदर अर्जाचे अवलोकन करून त्यावर पोनि भोसले व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर पो.नि.भोसले यांनी मला पंचासमक्ष तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानंतर लागलीच पो.नि. भोसले यांनी पडताळणी कारवाईचे नियोजन केले. त्यानंतर पो.नि. भोसले यांनी पंचासमक्ष मला पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये माझे व पंच नंबर 1नाईकनवरे व पंच नंबर 2 गावडे यांचे निवेदन घेतले त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टचे आतील असले बनियानचे आत मध्ये पिनचे सहाय्याने लावुन मला व पंच नं.1 असे आम्ही दोघे माझ्या ओला कंपनीची इलेक्ट्रीक मोटार सायकल क्रमांक एम.एच. 46 सी.जी. 9126 वरुन पिंपरी फाटा येथुन लोकसेवक जाधव यांची पळशी गावात भेट घेणेकामी 12.25 वा.चे सुमारास रवाना केले

त्यानंतर पळशी गावात पोहचल्यानंतर मी विशाल जाधव कुठे आहे याची खात्री करण्यासाठी माझा मोबाईल क्रमांक 7620357661 वरून वायरमन जाधव यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 8459067605 वर लाऊड स्पिकर ऑन करून फोन करून कोठे आहे याबात चौकशी केली त्यावेळी त्यास 'कधी येणार हाय इकड वस्तीकड' असे विचारले असता, विशाल जाधव याने मला 'वस्तीला वेळ लागेल, काम चाललय, पोल एक रवायच गावात,' असे सांगीतले त्यावेळी मी त्याचेशी कामाबाबत चर्चा करुन त्यास'ते कधी डी.पी. आणायला जाणार आहे.' असे विचारले असता त्याने मला 'डी.पी. आणायला आजच जायच हाय वर्गाणी असून निघली नाय त्याला गाडी भाड ही द्याव लागतय ना' असे म्हणाले, त्यावर मी त्यास'अच्छा कस ठरल मग' असे विचारले असता त्याने मला 'तीनशे रूपये' असे सांगीतले व कामाबाबत चर्चा करुन फोन कट केला त्यावेळी मी पुन्हा पंच नंबर 1 यांचेसह 13.30 वा चे सुमारास सापळा

पथक थांबले ठिकाणी आलो.
त्यानंतर पो.नि. भोसले यांनी पुन्हा पडताळणी कारवाईचे नियोजन करुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पंच नं.1 नाईकनवरे यांच्यासह मला माझ्याकडील दुचाकी वरून 14.00 वा चे सुमारास पळशी येथे रवाना केले. मी व पंच नंबर 1 असे पळशी गावात गेलेनंतर मी माझ्या मोबाईल फोनवरुन फोन करुन विशाल जाधव यास समक्ष भेटणेसाठी बोलावुन घेतले थोडया वेळात विशाल जाधव हा समक्ष येवुन मला भेटला त्यावेळी मी त्याचेशी कामाबाबत समक्ष चर्चा केली त्यावेळी मी त्यास 'कधी जाणार हाय आणायला' असे म्हणालो तेव्हा विशाल जाधव मला 'पैसे जमा झाल नायती उद्या जाणार हाय,' असे म्हणाला तेव्हा मी त्यास'एकाचे किती' असे म्हणालो असता, विशाल जाधव याने 'तीनशे रूपये तीनशे,' असे मला सांगीतले. त्यावर मी त्याला 'काल आणाय जाणार हुता, डी.पी.काय झाल?' असे म्हणालो असता, जाधव हा 'त्याला भाड न ही कोण द्याच, पदरच कोण भरायचं, लावलय सावंताला गोळा करायला, हिकडच मला कर म्हणलेत,'असे म्हणुन माझ्याकडे डी.पी.बसवणेसाठी एका कनेकश्नचे 300 रुपये प्रमाणे दोन्ही कनेक्शनचे मिळुन 600/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच नंबर 1 सापळा पथक थांबले ठिकाणी 14.46 वा चे सुमारास परत आलो.
त्यानंतर पळशी फाटा येथे आम्ही पुढील कारवाईकरीता थांबलो असताना जोराचा पाऊस आल्याने दिनांक 17/10/2024 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करणेबाबत मी विनंती केली तसेच. पो.नि.भोसले यांना विशाल जाधव हा गावात असेल तेव्हा फोन करुन कळविण असे सांगीतले. त्यानुसार पंचांचे व सापळा पथकाचे संमतीने दिनांक 17/10/2024 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.
दिनांक 21/10/2024 रोजी विशाल जाधव हा गावातच असल्याचे मी पो.नि.भोसले यांना सांगीतलेने ते पंच व सापळा पथकासह 10.15 वा माझे राहते घराचे समोरील मोकळ्या जागेत हजर झाले. त्यावेळी पो.नि.भोसले यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु केला त्यावेळी मी विशाल जाधव कुठे आहे याबाबत चौकशी करणेकरीता त्याचे मोबाईल फोनवर फोन केला तेव्हा विशाल जाधव याने मला लग्नाला चाललुय असे सांगीतले. तेव्हा मी त्यास 'येतो का ती पर्वा सांगीतलेल ती करतो.' असे म्हणालो असता तो 'आ... संध्याकाळी आता नाय... बाहेर चाललुय' असे म्हणाला. त्यांचेत व माझेत चर्चा झालेनंतर विशाल जाधव मला 'बर येतो' असे म्हणाला व त्याने फोन कट केला. विशाल जाधव हा गावात लवकर न आल्याने त्यावेळी पो.नि.भोसले यांना मी विशाल जाधव हा दिनांक 22/10/2024 रोजी भेटेल असे सांगीतल्याने दिनांक 22/10/2024 रोजी पुन्हा सापळा कारवाई करण्याचे नियोजन करुन दिनांक 21/10/2024 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.
दिनांक 22/10/2024 रोजी मी माझे राहते घरी पळशी येथे 09.45 वा.हजर असताना पो.नि. भोसले यांनी सापळा कारवाईचे नियोजन करून मला, पंचाना व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या.पोनि भोसले यांनी सांगितले प्रमाणे मी 600/-रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष हजर केली.पोनि भोसले यांचे सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले.पो.नि. भोसले यांनी अंथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावून सांगून सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती सांगितली.त्यानुसार पो.नि. भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली व अंथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम माझ्या शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवली व विशाल जाधव यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर सापळा पथकास दिसेल अशा रितीने डाव्या हाताने डोक्यावरून दोनदा हात फिरवून इशारा करण्याच्या सुचना पो. नि.भोसले यांनी मला दिल्या.
त्यानंतर पो.नि.भोसले यांनी माझ्या शर्टचे आतील असले बनियनला व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन जोडुन मला व पंच नं.1 नाईकनवरे यांना घराचे बाहेर 10.22 वा.चे सुमारास रवाना केले. तेव्हा मी विशाल जाधव यास फोन करुन माझ्या घरी बोलावुन घेतले. थोड्या वेळात विशाल जाधव हा तिथे आला तेव्हा मी पंच नंबर 1 यांचे समक्ष त्याचेशी कामासंबंधाने चर्चा केली त्यावेळी मी विशाल जाधव यास'डी पी च काय झाल?' असे विचारले असता त्याने 'बसवला की डी.पी.' असे सांगीतले. त्यावेळी विशाल जाधव यास कोणाचातरी फोन आला त्याचे फोनवरील बोलणे झालेनंतर माझकडे पाहुन उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन पैसे देणेबाबत सुचक इशारा केला तेव्हा मी त्यास माझ्याकडील 600/- रुपये लाच रक्कम 'ती तु सांगीतल्या प्रमाणे आपल दोन कनेक्शनच' असे म्हणुन त्याचे उजवे हातात दिली तेव्हा त्याने लाच रक्कम माझ्याकडुन घेवुन त्याचे शर्टचे खिशात ठेवुन दिली. तेव्हा मी लाच रक्कम स्विकारलेबाबत सापळा पथकास दिसेल असा पुर्वनियोजित इशारा केला असता पोनि भोसले व त्यांचे सहका-यांनी येवून विशाल जाधव यास लाचेच्या रक्कमेसह 10.30 वा.चे सुमारास ताब्यात घेतले. तसेच माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन पो.नि.भोसले यांनी त्यांचे ताब्यात घेतला. त्यावेळी पो.नि.भोसले यांनी सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकुण मला डी.पी.कधी बसवला याबाबत विचारणा केली असता आज रोजी सापळा कारवाईवेळी विशाल जाधव याने मला डी पी बसवला असल्याचे सांगीतले परंतु मागील चार दिवसापासुन

रोज मोठा पाऊस पडत असल्याने मी विहीरीकडे गेलोच नाही. त्यामुळे मी मोटार सुरु केली नाही. मी घरातच थांबुन असल्याने मला डी.पी.बसलेबाबत माहीती मिळाली नाही असे मी पो.नि.भोसले यांना सांगीतले. त्यानंतर पो.नि. भोसले यांनी सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई म्हसवड पोलीस स्टेशन येथे करण्याचे निश्चित केले.

तरी दिनांक 17/10/2024 रोजी विशाल लाला जाधव वय 27 वर्षे, व्यवसाय नोकरी - बाह्य स्त्रोत तंत्रज्ञ, (लाईन हेल्पर) महावितरण कंपनी मर्या, गोंदवले रा. पळशी ता.माण जि.सातारा याने माझ्या आईच्या नावे असलेल्या शेतातील दोन विदयुत मोटार कनेक्शन असुन पंधरा दिवसापुर्वी सदरचा डी पी जळाल्याने नवीन डी पी आणुन बसविण्याकरीता गाडीखर्चासाठी एका कनेक्शनचे तीनशे रुपये प्रमाणे दोन कनेक्शनचे मिळुन सहाशे रुपये लाचेची मागणी केली व लाच रक्कम दिनांक 22/10/2024 रोजी पळशी ता.माण जि.सातारा येथे तक्रारदार यांचे राहते घराचे समोर 10.30 वा चे सुमारास स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुद्ध कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आला असून तो बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली आहे.

समक्ष हा जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sakharam rakhmaji birajdar(I (Inspector)) / api **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sakharam rakhmaji

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** api

पोलीस ठाणे अंमलदार
म्हसवड पोलीस ठाणे